# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३७९/२०२३ दिनांक – २७/१०/२०२३

## "फिट राईज ७५ फिटनेस प्रोग्रामचे" अंतर्गत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस दलाकडून आयोजीत ५ कि.मी. दौडला पोलीसांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

सरदार वल्लभभाई पटेल राष्टीय पोलीस अकादमी, हैद्राबाद स्थापनेस ७५ वर्षे पुर्ण होत असल्याने त्यानिमीत्ताने मा. श्री. अमित शहा, गृहमंत्री, भारत सरकार यांचे संकल्पनेतुन संपुर्ण भारतभर "फिट राईज ७५ फिटनेस प्रोग्राम" हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाची सुरवात दिनांक २७/१०/२०२३ रोजी पासुन सुरु होत असुन सुरुवातीस ५ किलोमीटर असे अंतर धावायचे आहे. असे एकुण पुढील ७५ दिवस हा कार्यक्रम संपुर्ण भारतभर चालणार आहे. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयामध्ये देखील सदर फिट राईज ७५ हा कार्यक्रम राबविण्यात आला.

याअंतर्गत ५ कि.मी. दौडचे आयोजन करण्यात आले होते सदर दौड ही दि.२७/१०/२०२३ रोजी सकाळी ०९.३० वाजता सुभाषचंद्र बोस मैदान येथून चालू होवुन सुभाषचंद्र बोस मैदान ते राधास्वामी सत्संग मार्गाने मिरारोड रेल्वे स्टेशनपर्यंत व परत वळन घेवुन राधास्वामी सत्संग मार्गाने सुभाषचंद्र बोस मैदान येथ समाप्त झाली.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस दलाचे श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात आला होता. सदर दौड करीता मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाचे अपर पोलीस आयुक्त श्री. श्रीकांत पाठक, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) श्री. प्रकाश गायकवाड तसेच इतर वरीष्ठ अधिकारी यांचेसह मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस दलातील ५४८ पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे नातेवाईकांनी सहभाग नोंदविला .

सदर दौड मध्ये सहभागी पोलीस व त्यांचे नातेवाईक यांचेमधुन प्रथम,व्दितीय व तृतीय क्रमांक पटकवणाऱ्यांना मा.अपर पोलीस आयुक्त सो, यांचे हस्ते प्रमाणपत्र देवुन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

**महिला गटामधुन विजेत्यांची नावे**

| | महिला गट विजेत्यांची नावे | वेळ | नातेवाईक(पो.अधि./अंम.नाव) नेमणूक |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | कु.कृतीका वाघमारे | २०.५५ मि. | मपोशि/रुपाली बरफ नेम- पो.मुख्यालय (यांची बहिण) |
| व्दितीय क्रमांक | मपोहवा/रेश्मा श्रीधर कुटे | २६.०४ मि. | नियंत्रण कक्ष |
| तृतीय क्रमांक | पो.उप.निरी/सारिका वाघचौरे | २६.३५ मि. | नवघर पोलीस ठाणे |

**पुरुष गटामधुन विजेत्यांची नावे**

| | पुरुष गट विजेत्यांची नावे | वेळ | नातेवाईक (पो.अधि./अंम. नाव) नेमणूक |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | कु.निर्भय किणी | १७.२३ मि. | मपोशि/रुपाली बरफ नेम-पो.मुख्यालय (यांचे बंधु ) |
| द्वितीय क्रमांक | अमेय नारायण गाणेकर | १८.०० मि. | पोवि/१९०४२ नाराण पांडुरंग गाणेकर नेम-आचोळे पोस्टे (यांचा मुलगा) |
| तृतीय क्रमांक | पोहवा/०७१४३ रंजित तुकाराम बंगे | १९.३३ मि. | मिरारोड पोस्टे |

























